**।। ॐ श्री साईराम ।।**

**प्रश्नोत्तर सत्र –७२**

**धर्म कशासाठी?**

ॐ श्री साईराम

प्रश्नोत्तराच्या ह्या सत्रात तुमचे स्वागत असो! आज सकाळी एक मूलभूत प्रश्न विचारला आहे. धर्म कशासाठी आहे? कशासाठी? आपण धर्माशिवाय जगू शकत नाही का? तो खरंच आवश्यक आहे? का? हा प्रश्न आहे. त्याच्या अनुषंगाने अजून एक प्रश्न आहे. धार्मिक कोणाला म्हणायचे? धर्म कशासाठी आणि धार्मिक कोणाला म्हणाये हे दोन प्रश्न विचारले आहेत.

हा खरोखरच मूलभूत प्रश्न आहे कारण जर तुम्ही इतिहासाची पानं चाळलीत तर तुम्हाला आश्चर्य वाटेल की बहुतांश युद्ध ही राजकारणाहून अधिक धर्मावर आधारित होती. लोक धर्माद्वारे कसे विभाजित होतात हेही आपण पाहिले आहे. धर्माच्या बाबतीत किती कट्टर असतात ते! अक्षरश: धर्मवेडे असतात. एकमेकांची हत्या करण्यासही ते मागे-पुढे पाहत नाहीत.

ही खरोखरच आश्चर्यजनक आणि शरमेची बाब आहे. धर्माचे अनुसरण करताना आपल्याला लोकांची हत्या करण्याची इच्छा होते! हा धर्म असू शकतो का? दुसऱ्या धर्माविषयी अपशब्द उच्चारणे, वाईट बोलणे हे योग्य आहे का? तुम्ही खरोखरच धार्मिकस आहाता का? कोणता धर्म तुम्हाला एखाद्याची हत्या करण्यास सांगेल असं तुम्हाला वाटतं? तुम्ही कोणताही एखादा धर्म दाखवू शकता का कि जो असत्य, धादांद खोटं बोलण्यास वा खोटेपणा करण्यास सांगतो. कोणताही धर्म असं सांगेल का? कोणता धर्म अन्यायाच्या बाजूने उभा राहतो का? नाही!

सर्व धर्म एकच आहेत. ते सर्व धर्म, सत्य, धर्म, शांती, प्रेम आणि अहिंसा ह्यासारख्या मूलभूत मानवी मूल्यांची शिकवण देतात. ते सर्व ह्या मूलभूत मूल्यांवर उपदेश करतात. म्हणून मूलत: आपण सर्व एकच आहोत. हीच आध्यात्मिकता आहे. धर्म आपल्याला विभाजित करतात कारण धर्मानुसार सर्व विधी करण्यास धर्माची मागणी असते आणि प्रत्येक धर्माचे विधी वेगळे असतात. तेथे आपल्यामध्ये भिन्नता येते.

मग धर्म कशासाठी? असं जर तुम्ही मला विचारलं तर मी एवढंच म्हणू शकेन, की ह्या स्पर्धात्मक जगामध्ये आपण त्रस्त झालो आहोत. आपण ह्या जीवनाचे व्यापारीकरण केले आहे. समाजामध्ये आपल्याला सर्वत्र वादंग, तीव्र मतभेद आणि संघर्ष पाहायला मिळतो. येथे नेहमीच वर्चस्व राखण्याची वृत्ती बळवालेली दिसते. एक पंथ दुसऱ्याहून अधिक श्रेष्ठ असल्याचे समजतो. हे एवढंच आहे का? नाही. ह्याच्यामुळे आपण जीवनातील दिव्य आनंद गमावून बसतो. त्याबाबतीत आपण कविता, नृत्य वा अद्‌भुत कल्पित कथा हे सर्व गमावतोच आहोत. तेथे आनंद नाही, दिव्य आनंद नाही आणि म्हणून हीच वेळ आहे ह्याच क्षणी आपण धर्माची गरज जाणून घेतली पाहिजे.

धर्म म्हणजे केवळ रितीरिवाजांचे पालन करणे, पूजन करणे वा यज्ञयाग आयोजित करणे नव्हे. तो एक विधी असू शकतो. परंतु, ते म्हणजे संपूर्ण धर्म नाही. कारण जर तुम्ही खरोखरच एक धार्मिक व्यक्ती असाल तर तुम्ही कृपावंत असाल. तुमचे जीवन कृतज्ञतेने व्याप्त असेल आणि तुमच्या वर्तणुकीतून करुणा प्रतिबिंबीत होईल. मग तुम्ही केवळ धर्माचे अनुयायी नाही तर तुम्ही एक धार्मिक व्यक्ती आहात.

तुम्ही एखाद्या धर्माचा शिक्का असलेली व्यक्ती आहात वा तुम्ही एका एका धर्माशी संलग्न आहात ह्यापेक्षा तुम्ही एक धार्मिक व्यक्ती बनण्याची गरज आहे.

जीवनाला धर्माचे अधिष्ठान असेल तर कृतज्ञता, करुणा ह्यासारखे गुण विकसित होतात. जीवन सार्थ बनते. आपण जीवनाचा आनंद घेऊ शकतो. जीवन सकारात्मक होते. सुखद, आनंदी आणि कृतज्ञ जीवन जगणे शक्य होते. एवढेच नाही तर अशा धार्मिक व्यक्तीचा मृत्युसुद्धा उदात्त असतो. हे अनेकांच्या बाबतीत खरोखर घडले आहे.

तुमचा अहंकार कदाचित, तुम्ही त्या एका विशिष्ट धर्माचे आहात असा दावा करण्यास सांगेल. ''मी मुस्लिम आहे'', ''मी ख्रिश्चन आहे'', ''मी बौद्ध आहे.'' इ. हा अहंकाराचा दावा आहे. परंतु हे योग्य प्रोत्साहन नाही, योग्य घोषणा (कथन) नाही.

मग धर्म म्हणजे काय? तुमची जीवनपद्धती तुमची जीवनशैली तुमच्या धर्माला पूरक असायला हवी. केवळ निवेदन वा घोषणा नको. का? सर्व दिव्य गुरुंचे महापुरुषांचे अवलोकन करा. त्यांच्या जीवनाचे निरीक्षण करा. ख्रिस्त, बुद्ध, महावीर आदि शंकराचार्य, गुरुनानक हे सर्व उदात्त पुरुष आहेत. त्यांचे निरीक्षण करा. ते केवळ धर्मात्मक नाहीत हे तुमच्या लक्षात येईल. धर्मशील म्हणजे काय आणि धर्मशील कसं बनायचं हे ते सांगतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ते धार्मिकतेची प्रतीकं आहेत. एखाद्या विशिष्ठ धर्माशी संलग्न असा निव्वळ शिक्का मारून घेतलेले महापुरुष नव्हेत.

आपण व्यापारीकरणापासून स्वत:ला दूर ठेवले पाहिजे. स्पर्धात्मक जग आणि गळेकापू स्पर्धेपासून स्वत:ला थोडेसे दूर ठेवायला हवे. जीवनातील मतभेद, वादविवाद, षडयंत्र व संघर्ष ह्याच्या पलीकडे स्वत:ला विकसित करायला हवे. आपल्या भोवतालच्या लोकांच्या वर्चस्व गाजवण्याच्या प्रवृत्तीपासून दूर व्हायला हवे. कारण काही लोकांना तुमच्यावर सत्ता गाजवण्याची इच्छा असते. त्यांना तुमच्यावर हुकूमत चालवायची असते. आपण त्यापासून दूर राहूया. जे धार्मिक असतात त्यांनाच हे शक्य होते. तुम्ही जीवनाचा खरो आनंद घेऊ शकता. तुम्हाला खरा आनंद, दिव्य आनंद, अद्भूत अनुभव तसेच जीवनाचा शोध ह्या सर्व गोष्टींची अनुभूती घेता येते कारण हे सर्व धार्मिक असण्यावर आधारित आहे.

आपण आपल्याला प्रश्न विचारला पाहिजे मी का जन्मलो? माझ्याकडे ह्याचं उत्तर नाही. मी माझं जीवन कसं जगतो आहे? मी दीर्घ जीवन जगलो. कसं? मला माहीत नाही. जीवन चालू आहे. अविरतपणे चालू आहे. एखाद्या नदीच्या प्रवाहासारखे अविरत वाहत आहे. माझ्या कधी हे लक्षात आलं का? दिवसामागून दिवस सरत आहेत, वर्षामागून वर्ष सरत आहेत. जीवनाचा डाव, वय दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु, मी कोण आहे? मी म्हणजे काय? ह्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत.

जीवन हे असंच चाललं आहे. ह्याचा जेव्हा आपल्याला बोध होतो तेव्हा हे आपल्यामुळे नाही ह्याचीही आपल्याला जाणीव होते. तुम्ही कोणत्याही गोष्टींसाठी उत्तरदायी नाही! श्वासोच्छ्वास तुमच्या नियंत्रणात आहे का? रक्ताभिसरण – त्यावर तुमचे नियंत्रण आहे का? जन्ममृत्यूचे तुम्ही नियमन करू शकता का? तुम्ही ते घोषित करू शकता का?

म्हणून आपल्याकडे ह्या प्रश्नांची उत्तरे नाहीत. परंतु अशा निरर्थक प्रश्नांची उत्तरे शोधण्यापेक्षा, आत्मसाक्षात्कारासाठी परमेश्वराने दिलेल्या ह्या अमोलिक जीवनासाठी आपण त्याच्याप्रती अत्यंत कृतज्ञ भाव व्यक्त केला पाहिजे आणि त्याचे खूप खूप आभार मानले

पाहिजेत. ''मी कोण आहे?'' ह्या प्रश्नाचे उत्तर – ''मी परमेश्वर आहे.'' आणि हे संपूर्ण जीवन ही परमेश्वराची अनमोल भेट आहे. त्याचे दिव्य कृपाशीर्वाद आहेत. आपल्यामधील दिव्यत्वाचा साक्षात्कार होण्यासाठी जीवन योग्य प्रकारे जगले पाहिजे.

एवढं करूनही आपल्यामध्ये भिन्नता असू शकते. समजा, एखाद्याकडे काही वृक्ष आहेत. त्यातले काही मध्यम आकाराचे आहेत, काही वडाच्या झाडासारखे विशाले आहेत. लहान वृक्ष आश्रय देतात, विशाल वृक्ष, मोठ्या मोठ्या फांद्यासुद्धा आश्रय देतात. मला आश्रय हवा, निवारा हवा. त्या वृक्षाच्या आकाराशी मला काही कर्तव्य नाही. इमारतींच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. इमारत छोटी असो वा मोठी परंतु आपल्याला निवारा हवा असतो, डोक्यावर छप्पर हवे असते. हे आपण समजून घेतले पाहिजे. म्हणून काहीही असो, धार्मिक बनणे अत्यंत महत्त्वाचे आणि आवश्यक आहे. प्रशांती निलयममध्ये साऊथ इंडियन कँटीन, नॉर्थ इंडियन कँटीन आणि वेस्टर्न कँटीन अशा तीन कँटीन आहेत. हे चांगलेच आहे. कोणतेही कँटीन असो. पोषणासाठी आपल्याला अन्न अत्यावश्यक आहे. मग ते कँटिन साऊथ, नॉर्थ का वेस्टर्न आहे हा आपला प्रश्न नाही.

म्हणून आपण धार्मिक असण्याची गरज आहे. ज्यासाठी शरणागती आणि स्वीकृती आवश्यक आहे. 'हे प्रभु, जे माझ्या जीवनात घडतंय ते तू योजलेले आहेस. जीवन पूर्वनियोजित असते. त्याचा मी विनाशर्त स्वीकार करतो.' हीच शरणागती आहे. 'हे प्रभु, मला तुझ्या दिव्य चरणांशी आश्रय घेऊ दे.' हाच खरा धर्म आहे. म्हणून जीवनामध्ये परिवर्तन अत्यंत आवश्यक आहे. बाबा म्हणतात,

१) सर्व धर्म 'चांगले बना' अशी शिकवण देतात.

२) जर तुमची मने चांगली, उचित आणि विवेकी असतील तर कोणताही धर्म वाईट नाही. कोणताही धर्म निंदनीय नाही.

३) जर तुमची मने उचित, सतर्क, जागृत असतील तर कोणताही धर्म वाईट नाही. हे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

म्हणून आपण परमेश्वराशी वचनबद्ध रहायला हवे. त्याच्यशी शरणागत व्हायला हवे, ''जसे स्वर्गातील देवदूत परमेश्वराची सेवा करतात तशी पृथ्वीवरील लोकांनी त्याची सेवा करावी.'' असे पवित्र बायबलमध्ये सांगितले आहे. आपल्या सनातन धर्मातही 'ईश्वरेच्छा बलियेसी' असे स्पष्टपणे म्हटले आहे. तुमची व्यक्तिगत इच्छा नाही. धर्म तुमच्याकडे ह्या शरणागतीची मागणी करतो. ''हे प्रभु! तुझ्या योजनेनुसार गोष्टी घडू देत. हे प्रभु! माझ्यावर दया कर. तुझ्या इच्छेचा मी बिनशर्त स्वीकार करतो.'' असा आपला भाव आणि प्रार्थना असायला हवी.

धर्म कशासाठी? ह्या प्रश्नाचे उत्तर - कशासाठीचं कारण : जरी शक्य ते सर्व केले, संपादन केले वा सामाजिक कार्यांमधील प्रत्येक क्षेत्रात यश संपादन केले तरी असंतोष वा असमाधानाचा अंश राहतोच. काहीतरी त्रुटी वा अंतरात रिक्ततेची भावना राहतेच. ही त्रुटी, रिक्तता वा चिंता ह्याचे निराकरण करण्यासाठी धार्मिक बनणे हा उपाय आहे. केवळ ते एकच आश्रयस्थान आहे हे समजून घेतले पाहिजे. जय साईराम! पुन्हा भेटू.